रविवार दि.१४ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २३३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# मातृतीर्थ सिंदखेड राजाचे तहसिल कार्यालय बनले भ्रष्टाचाराचा अड्डा

लोकनेता न्युज नेटवर्क

सर्व प्रथम आज १४ एप्रिल राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन....

लोकांनी लोकांचे लोकांसाठी बनविलेले सरकार म्हणजे लोकशाही. याच लोकशाहीच्या व्याखेला लाजवेल अशी भ्रष्टाचाराची प्रकरणे दिवसेंदिवस वाढतच जात आहेत. शिवाजी महाराजांचे आजोळ असलेली नगरी मातृतीर्थ सिंदखेड राजा ही ऐतिहासिक नगरी म्हणून जग भर ओळखल्या जाते. पण ज्या नगरिने अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आणि हिंदवी स्वराज्याची संकल्पना देऊन छत्रपतींना घडवलं अशा माता जिजाऊंच्या जन्मस्थळी आज नव्हे नव्हे ते प्रकार घडतांना दिसतात.




भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा मोलाचा संदेश आहे की आत्म-सन्मानाने जगता येत नसेल तर ते जगणं नव्हे. या जगात टिकण्यासाठी शिकावं लागेल, पण शिकून इतकंही मोठं होऊ नये कि हातात आलेला पेन अनेकांच्या गळ्याचा सुरा बनेल. संविधान सर्वांना जगण्याचं स्वातंत्र्य देतंय. अन्याय होत असेल तर त्यावर आपल्याला बोलता आलेच पाहिजे आणि जर स्वत:ला बोलता येत नसेल तर इतर बोलणाऱ्या लोकांना आपण साथ देणं आपलं काम असतं.

(दि१२ एप्रिल, २०२४) रोजी सिंदखेड राजा तहसिल कार्यालयाचे तहसीलदार, चालक व शिपाई यांना ३५ हजार रूपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. झालेला प्रकार आपण सर्वांनी सविस्तर वाचलेलाच आहे. विज्ञानाचा नियम आहे की मोठे चाक फिरल्या शिवाय लहाने चाक फिरत नाही. असा प्रकार घडलेला प्रसंग सांगून जातो. नियमित तहसील कार्यालयात येरझारा घालणाऱ्या लोकांच्या लक्षात येते की इथे काय चालू आहे. अनेक शेतकरी ईथे चकरा मारून थकलेत पण टेबलावर वजन ठेवल्या शिवाय इथे जवळ जवळ सर्वच विभागामध्ये काम होत नसल्याचं दिसून येतं. मागे, ४ टक्के कमिशन देण्यास नकार दिल्याने ज्ञानेश्वर खरात या युवकासोबत नायब तहसीलदार यांनी घडवून आणलेला प्रकार सर्व तालुक्याने बघितला आहे. या व्यतिरिक्त अन्य विभागातील माहितीची हेरा फेरी, कर्मचाऱ्यांवर तहसिलदारांचे नसलेले लक्ष किंवा सहेतुक दुर्लक्ष, गुंड प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांची पाठराखण असे अनेक प्रकार तहसील कार्यालयात घडतात. आवाज उठवणाऱ्याचा आवाज दाबण्याचे काम प्रामुख्याने येथे केले जाते. मागील काही महिन्यांमध्ये अनेक उपोषणे तहसिल कार्यालयासमोर बसलित पण त्यांना देखील पोकळ आश्वासने देऊन वाटेला लावण्यात आले.

**टिका नव्हे टिपणी (जनहितास्तव)**

तहसिल कार्यालयातील कॅमेरे चालू नसल्याचे अनेक वेळा समोर आले. सर्व शासकीय कार्यालयात कॅमेरे सुरू असायला हवेत. तेथील यंत्रणा कशा पद्धतीने काम करते या कडे कोणाचं लक्ष नसले तरी कॅमेरा लक्ष ठेवू शकतो. परंतु येथील कॅमेरे देखील बंद आहेत. कर्मचारी वेळेवर येत नसल्याचं चित्र स्पष्ट झालेलं आहे. बायोमेट्रिक प्रणालीचा वापर व्हायला हवा तो होत नाही. अशा अनेक प्रश्नांवर आवाज कोण उठवणार ? शेतकर्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कोणीही तयार नाहीत. पैसे असतील तर कोणतेही काम येथे झपाट्याने होते परंतु सर्व सामान्य माणसाने पैसे द्यायचे तरी कुठून ? ४ टक्क्या सारखे अनेक प्रकार येथे सुरू आहेत. अक्षरशः वेड लागल्या सारख्या प्रवृत्तीचे कर्मचारी येथे आहेत. सिंदखेड राजा पासुन जवळंच साखरखेर्डा असेल, इतर गावे असतील जे तालुक्या पासून ७०-८० कीमी. अंतरावर आहेत. तेथून शेतकरी आपल्या कामासाठी येथे येत असतात. परंतु त्यांचे काम न झाल्यास त्यांना परत येरझारा घालत राहावे लागते. याचे कोणाला भान आहे का ?

नव्याने सुरू झालेल्या दैनिक लोकनेता च्या टिका नव्हे टीपणी या सदराला नियमित वाचायला विसरू नका दर रविवार आणि आपले प्रश्न आमच्या पर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करा. आपले नाव गुपित ठेवून आम्ही नक्कीच प्रसार माध्यमांतून त्याला वाच्या फोडण्याचा प्रयत्न करू....

**ज्ञानेश्वर बुधवत**
**मुख्यसंपादक दैनिक लोकनेता**
**मातृतीर्थ सिंदखेड राजा**
**९९६०२०९१९**

## प्रा. खडसे साहेब आपणच शेतकऱ्यांचे वाली व्हा



अनेक शेतकरी असे आहेत की जे आपले काम होत नाही, परंतु पुढील काम देखील होणार नाही या भीतीने उपविभागीय कार्यालयात कोणत्याही कर्मचाऱ्याच्या विरोधात बोलण्यासाठी येऊ शकत नाहीत. परंतु जर इथे आता आपल्यासारखे कर्तव्यदक्ष वरिष्ठ आलेत तर त्यांचे संबंधितांवर विशेष प्रकारे लक्ष असल्यास्, होणारा भ्रष्टाचार कमी होऊन शेतकऱ्यांची कामे लवकर होतील. अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केलेली आहे. आपल्या कामामुळे नियमित चर्चेत असलेले उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे हे नियमित क्शन मोड वर असल्याचे दिसून येते आणि मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे प्रा. खडसे यांच्या सारखे अधिकारी असतील तर काहीच दिवसात मातृतीर्थ सिंदखेड राजाचे चित्र बदलल्याशिवाय राहणार नाही असा आशावाद लोकांनीच नव्हे तर दैनिक लोकनेता चे संपादक यांनीही व्यक्त केला आहे. व त्यांना तशी खात्रीही आहे.

## कर्मचारी प्रतिनियुक्तीवर सिंदखेड राजा येथेच कसे ?

गेल्या अनेक वर्षांपासून तहसिल कार्यालयातून काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या नाहीत. परंतु काही कर्मचारी असे देखील आहेत की त्यांना प्रतिनियुक्तीती सिंदखेड राजा येथेच दिलेली आहे. त्यामुळे ती त्यांना कशी मिळते ? हा देखील मोठा प्रश्न नागरिकांसमोर उभा राहतो ? यामागे कोण आहे ? की याकडे रमुद्दामहून दूर्लक्ष केल्या जाते ? असे अनेक प्रश्न येथे उपस्थित होतात. म्हणूनंच नाईलाजाने म्हणावे लागते की, मोठे चाक फिरते तेव्हा छोटी चाके फिरतात, हा विज्ञानाचा नियम आहे. पण आता जनतेला सुध्दा मा. प्रा. संजय खडसे साहेबांच्या सिंदखेडराजा येथील नियत्कीमुळे एक आश्वासक दिलासा मिळाला आहे की,हे चित्र लवकरच बदलेल !

## अनाहुत मध्यस्थ माणसां मार्फत कारभार चालत असल्याचे चित्र!

कर्मचाऱ्यांच्या खुर्ची जवळ मध्यस्थ ( एजंट ) ची खुर्ची लागून असल्याचे येथे नियमित बघायला मिळते. काही व्यक्ती जी संबंधित विभागात नाहीत अथवा तहसील कार्यालयात कोणत्याही पदावर नाहीत अशी माणसं महिनो महिने तिथेच स्थायिक झाल्या सारखे या कार्यालयात काय करीत असतात ? या कडे वरिष्ठांनी लक्ष द्यायला हवे असे आम्हा जनतेला वाटते. कारण संबंधित कर्मचाऱ्यांचे आर्थिक देवाण घेवाणीचे काम अशा व्यक्तींमार्फत चालते हे लपलेले नाही.



# ज्ञानाचे प्रतीक बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । प्रतिनिधी

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने, ज्ञानाने संपूर्ण जग प्रभावित आहे.म्हणूनच 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' म्हणून बाबासाहेबांची ओळख असून जगभरातील विद्यार्थी त्यांच्यावर अभ्यास करण्यासाठी उत्सुक असतात. त्यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त ज्ञानाचे प्रतीक बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाच्या अथांग महासागरास आणि त्यांच्या कार्यास थोडासा उजाळा देताना. भारतीय ज्ञानशास्त्रज्ञ,अर्थशास्त्रज्ञ,राजकारणे तत्वज्ञ आणि समाज सुधारक म्हणजेच बोधिसत्व डॉ. भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी दलित चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य( दलित) लोकांविरुद्ध होणारा भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारल्या तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्काचे समर्थन केले ते ब्रिटिश भारताचे पहिले मजूर मंत्री स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री भारतीय घटनेचे शिल्पकार भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार,आधुनिक भारताचे निर्मातेअसेही म्हणतात.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ नाव भीमराव होते. त्यांचे वडील श्री रामजी वल्द मालोजी सकपाळ हे महू येथेच मेजर सुभेदार पदावरील लष्करी अधिकारी होते. त्यांनी आणि त्यांची पत्नी भीमाबाई यांनी त्यांच्या सेवेची शेवटची वर्षे काली पलटण येथील जन्मस्थान स्मारकाच्या जागेवर असलेल्या बॅरेकमध्ये घालवली. इ स वी १८९१ मध्ये १४ एप्रिल रोजी रामजी सुभेदार कर्तव्यावर असताना रात्री १२ वाजता भीमरावांचा जन्म झाला. मुलाचा प्रारंभिक काळ कबीर पंथी वडील आणि धार्मिक आईच्या कुशीत शिस्तबद्ध होता.

बालक भीमराव यांचे प्राथमिक शिक्षण दापोली व सातारा येथे झाले. १९०७ मध्ये त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन स्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. यावेळी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला व भेट म्हणून त्यांचे शिक्षक श्री कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी त्यांना 'बुद्ध चरित्र' हा स्वलिखित ग्रंथ भेट म्हणून दिला. भीमरावांनी बडोदाचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्याकडून फेलोशिप मिळाल्यानंतर १९१२ मध्ये मुंबई विद्यापीठातून पदवी उत्तीर्ण केली. संस्कृत शिकण्यास मनाई असल्याने ते फारसी घेऊन उत्तीर्ण झाले.बी.ए नंतर एम.ए अध्ययन हेतू बडोदा नरेश सयाजी गायकवाड यांची पुन्हा फेलोशिप मिळाल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात शिक्षणासाठी प्रवेश घेतला. १९१५ मध्ये त्यांनी पदव्युत्तर पदवीची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यासाठी त्यांनी 'कॉमर्स ऑफ एन्शेंट इंडिया' हा प्रबंध लिहिला. त्यानंतर १९१६ मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. उपाधी प्राप्त केली. 'ब्रिटिश भारतातील प्रांतीय वित्ताचे विकेंद्रीकरण' हा संशोधनाचा विषय होता.

फेलोशिप पूर्ण केल्यानंतर त्यांना भारतात परतावे लागले, त्यामुळे ते ब्रिटनमार्गे परतत होते. तिथल्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समध्ये त्यांनी एम.एससी. आणि डी.एससी आणि लॉ इन्स्टिट्यूटमध्ये बार-एट-लॉ पदवीसाठी नोंदणी केली आणि भारतात परतले. सर्वप्रथम शिष्यवृत्तीच्या अटीनुसार त्यांनी बडोद्याच्या राजाच्या दरबारात लष्करी अधिकारी आणि आर्थिक सल्लागार ही जबाबदारी स्वीकारली. संपूर्ण शहरात कोणीही त्याला कामावर घेण्यास तयार नसल्याच्या गंभीर समस्येमुळे तो काही काळानंतर मुंबईत परत आले.

परळ येथे डबक चाळ आणि कामगार वसाहतीत अर्धवेळ अध्यापन आणि वकिली करून अपूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी तेथे राहत होते आणि पत्नी रमाबाई यांच्यासोबत राहत होते. १९१९ मध्ये डॉ. आंबेडकरांनी राजकीय सुधारणांसाठी स्थापन केलेल्या साऊथबरो कमिशनसमोर राजकारणात दलित प्रतिनिधित्वाच्या बाजूने पुरावे दिले. अशिक्षित आणि गरीब लोकांना जागरूक करण्यासाठी त्यांनी मूकनायक आणि बहिष्कृत इंडिया या साप्ताहिकांचे संपादन करून मूक आणि अशिक्षित आणि गरीब लोकांना जागरुक केले आणि आपले अपूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते लंडन आणि जर्मनी येथे गेले आणि तेथून एम.एससी., डी.एससी., आणि बॅरिस्टर पदव्या प्राप्त केल्या. त्यांच्या च.डल. चे संशोधनाचे विषय होते इम्पीरियल फायनान्सच्या प्राप्य विकेंद्रीकरणाचा विश्लेषणात्मक अभ्यास आणि त्यांच्या ऊडल. पदवीचा विषय रुपयाची समस्या, त्याची उत्पत्ती आणि उपाय आणि भारतीय परिसंचरण आणि बँकिंगचा इतिहास होता.

डी. लिट. पदवी डॉ. आंबेडकर यांना कोलंबिया विद्यापीठाने ङ.ङ.ऊ आणि उस्मानिया विद्यापीठाने ऊ ङ्ळीीं या मानद पदवी बहाल केल्या. अशा प्रकारे डॉ. आंबेडकर जागतिक तरुणांसाठी प्रेरणास्थान बनले कारण त्यांनी बीए, एमए, एमएससी, पीएचडी, बॅरिस्टर, डीएससी, डी.लिट. एकूण २६ पदव्या मिळवल्या.

भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकरांनी आपल्या ६५ वर्षांच्या आयुष्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, साहित्यिक, औद्योगिक, घटनात्मक अशा विविध क्षेत्रात अगणित कार्य करून राष्ट्र उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

डॉ. बी. आर. आंबेडकरांनी ०२ वर्षे,११ महिने आणि १८ दिवसांच्या अथक परिश्रमाने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवतेवर आधारित भारतीय संविधान तयार केले आणि २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सुपूर्द केले. देशातील सर्व नागरिकांना राष्ट्रीय एकात्मता, व्यक्तीच्या अखंडतेच्या आणि प्रतिष्ठेच्या जीवनपद्धतीने भारावून गेलेली भारतीय संस्कृतीने अभिभूत केले.

१९५१ मध्ये त्यांनी हिंदू कोड ऑफ वुमन एम्पॉवरमेंट विधेयक मंजूर होण्यासाठी प्रयत्न केले आणि ते मंजूर झाले नाही तेव्हा त्यांनी स्वतंत्र भारताच्या पहिल्या कायदा मंत्री पदाचा राजीनामा दिला. सन १९५५ मध्ये त्यांचा ढर्हेीसहीं`प ङळपर्सीीळीींळल डीरींशी हा ग्रंथ प्रकाशित करून, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांची पुनर्रचना करून छोट्या आणि आटोपशीर राज्यांमध्ये पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव ठेवला होता, जो ४५ वर्षांनंतर काही प्रदेशांमध्ये प्रत्यक्षात आला.लोकशाही बळकट करण्यासाठी राज्याची तीन अंगे, न्यायपालिका, कार्यपालिका आणि विधिमंडळ या स्वतंत्र आणि स्वतंत्र केल्या गेल्या आणि समान नागरी हक्कांनुसार एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य हा घटक सुरू करण्यात आला.

देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी निजामाच्या जोखडाखाली अडकलेल्या हैदराबाद संस्थानातील लढ्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे नतिक पाठबळ मिळाले होते. त्यातूनच मराठवाड्यात स्वातंत्र्याची पहाट झाली. धर्मसत्ता व राजसत्ता कधीच एकत्र नांदू शकत नाहीत, या शब्दांत बाबासाहेबांनी निजामाच्या धार्मिक सत्तेला विरोध केला होता.

त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केलेला आहे. अस्पृश्यता, जातीवाद समूळ नष्ट करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. मूकनायक, प्रबुद्ध भारत, बहिष्कृत भारत, जनता, समता या नियतकालिकांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक समतेचा लढा लढला. बहिष्कृत हितकारिणी, स्वतंत्र मजूर पक्ष अशा संघटना उभारून त्यांनी समतेचा लढ्याला अधिष्ठान प्राप्त करून दिले. आंबेडकरांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्य, उद्योग आदी क्षेत्रात अमूल्य योगदान दिलेले आहे.

डॉ.बी.आर. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध जयंती दिल्ली येथे साजरी झाली होती. याप्रसंगी आंबेडकरांनी बुद्धांच्या जीवन कार्यावर विचार मांडले. या जयंती समारंभास अनेक देशांचे प्रतिनिधी, भिक्खू संघ व सुमारे वीस हजार लोकांचा समुदायही उपस्थित होता.

इ.स. १९५१ मध्ये आंबेडकरांच्याच अध्यक्षतेखाली तीन दिवसीय बुद्ध जयंती महोत्सव साजरा झाला. इ.स. १९५६ ला आंबेडकरांनी आपल्या आयुष्यातील शेवटची बुद्ध जयंती दिल्लीतच साजरी केली. आंबेडकरांनी दिल्लीशिवाय महाराष्ट्रातही बुद्ध जयंतीस इ.स. १९५३ पासून सुरुवात केली. इ.स. १९५६ पर्यंत त्यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत बुद्ध जयंतीचे महाराष्ट्रात भव्य कार्यक्रम झाले. महाराष्ट्रातले बुद्ध जयंतीचे कार्यक्रम प्रामुख्याने मुंबईत झाले. भारतात व महाराष्ट्रात बुद्ध जयंती महोत्सवाच्या परंपरेची सुरुवात आंबेडकरांनी केली, म्हणून त्यांना भारतातील सार्वजनिक बुद्ध जयंती महोत्सवाचे प्रणेते समजले जाते.

सन १९९० मध्ये डॉ. बी आर आंबेडकर यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. इ.स.१९५५ मध्ये काठमांडू, नेपाळ येथे झालेल्या जागतिक बुद्ध परिषदेत सहभागी बौद्ध भिक्खूंनी त्यांना बोधिसत्व उपाधी प्रदान केली.महाराष्ट्र शासनाने इ.स. २०१७ मध्ये आंबेडकर जयंती 'ज्ञान दिन' म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला महाराष्ट्रात आंबेडकरांची जयंती ज्ञान दिन म्हणून साजरी केली जाते. आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी 'मनुस्मृती' या ग्रंथाचे जाहिरपणे दहन केले होते. त्यामुळे '२५ डिसेंबर' हा दिवस 'मनुस्मृती दहन दिन' म्हणून पाळला जातो.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकांड पंडित होते. त्यांचा विविध विषयांवरचा व्यासंग अफाट होता. व इतर लेखन हे विपूल प्रमाणात आहे. त्यांच्या लेखन साहित्यात त्यांनी लिहिलेली ग्रंथ-पुस्तके, प्रबंध, लेख, भाषणे, स्फुटलेख, पत्रे, वर्तमानपत्रे इत्यादींचा समावेश होतो. भारतातील कोणत्याही राजकीय नेत्याने केले नाही एवढे अधिक लेखन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. पूर्ण झालेले एकूण २२ ग्रंथ आणि पुस्तिका, १० अपूर्ण राहिलेले ग्रंथ, १० निवेदने किंवा साक्षीपुरावे, १० शोधनिबंध, लेख आणि परिक्षणे हा एवढा संग्रह आंबेडकरांच्या इंग्रजी लेखनाचा आहे. आंबेडकर हे बहुमुखी प्रतिभाशाली होते. ते मराठी, संस्कृत, पाली, इंग्लिश, हिंदी, फ्रेंच, जर्मन, गुजराती, बंगाली, कन्नड व पारसी या भाषा जाणणारे विद्वान होते. आंबेडकरांचे बहुतांश लेखन हे इंग्रजीत, काही मराठीत आणि बाकी इतर भाषेतील आहे. त्यांनी आपल्या लेखनातून धर्मसुधारणा व समाजसुधारणा याकडे प्रामुख्याने लक्ष दिले. महाराष्ट्र शासनाने बाबासाहेबांच्या भाषण व लेखन साहित्याचे आतापर्यंत एकूण २२ खंड प्रकाशित केले आहे, अजून खूप बरेचशे लेखन प्रकाशीत आहे. त्यांच्या संपूर्ण साहित्याला एकूण ४२ खंड देखील अपूरे पडतील असे आंबेडकरांच्या ग्रंथावर काम करणाऱ्या प्रकाशन समितीचे म्हणने आहे. मल्याळम भाषेत बाबासाहेबांच्या साहित्याचे ४० खंडावर प्रकाशीत झाली आहे. त्यांनी अनेक विषयांवर मूलभूत चिंतन केले. त्यातून अनेक अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथसंपदेची निर्मिती झाली. या ग्रंथसंपदेतूनच त्यांची सर्वसमावेशक आणि समन्यायी अशी वैचारीक भूमिका स्वयंस्पष्ट होते. त्यांचे अनुयायी बाबासाहेबांच्या सन्मार्थ जय भीम चा नारा देतात. आज आपण बाबासाहेबांचे प्रेरणादायी विचार आपल्या जीवनात अमलात आणण्याची प्रतिज्ञा घेतली पाहिजे.

**संतोष हरी कांबळे**
**रा.कंधार ता. कंधार जि.नांदेड**
**मो. नं – ९७६३३९५५५७**

# चला, बाबासाहेबांची संगत करूया !

लोकनेता न्युज नेटवर्क



महामानव कालातीत असतात. ते आपल्या अस्तित्वाने आपला वर्तमान फुलवून टाकतात आणि भविष्यकाळ कायमचा जागृत करून जातात. वृक्षाप्रमाणे स्वतः अंगावर ऊन, वारा, पाऊस झेलून भविष्याला महान विचारांची सावली, ग्रंथरूपी सुगंध आणि विचारांची फळे अनंत काळासाठी आपल्याला विनामुल्य मागे ठेवून जातात. सज्जनहो, आज आपण बोधिसत्व, महामानव, प्रज्ञासूर्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करतांना सर्वांनीच त्यांची नित्य संगत करणे काळाची गरज बनली आहे. भारत मातेच्या वीर पुरुषांच्या अहोरात्र संघर्ष, कष्टाने आणि रक्ताने स्वतंत्र झालेली भारत माता आणि तिचे स्वातंत्र्य आपल्याला अबाधित, चिरकाल ठेवतांना इथला क्रांतीचा, नवनिर्माणाचा, स्वातंत्र्याचा विचार चिरंतन, जिवंत ठेवावा लागणार आहे. मित्रहो, सत्याच्या, क्रांतीच्या मार्गावर चालणाऱ्या लोकांसाठी काळ नेहमीच खडतर असतो. ज्या ज्या महापुरुषांनी जगाला नवा, सत्याचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला त्यांच्या जीवनात त्यांना प्रचंड संघर्ष करतांना त्यांच्या जीवनाचा शेवट गोड झालेला आढळत नाही. अगदी सॉक्रेटीस, रोमेल, येशू ख्रिस्त, ज्ञानोबा, एकनाथ, जोतीबा, सावित्रीबाई, बाबासाहेब आणि अलीकडच्या समाजसुधारकांचा शेवट खडतर झालेला इतिहासाला माहिती आहे. याचा अर्थ काळ बदलला की; सत्याची कास धरणारी नवीन माणसे निर्माण व्हायला पाहिजेत की नाही? हा सतत सतावला जाणारा प्रश्न मला नेहमीच सतावत असतो. आज काल सगळीकडे केवळ चर्चा करणाऱ्या लोकांच्या टोळ्या दिसताहेत मात्र कुणीही मांजराच्या गळ्यात घंटा बांधायला धजावत नाही. ठीक आहे. हे ही दिवस जातील. असे असले तरी अलीकडच्या दहा वर्षात माणसं प्रचंड बदलतांना दिसत आहेत. एकीकडे क्रांतीच्या वल्गना करतांना दुसरीकडे माणूस भ्रांती हरवत चाललेला दिसतोय. वेगवेगळे इझम आणि विविध प्रकारच्या कट्टरता माणसातील खरा माणूस झाकाळून टाकत आहेत. अगोदरही माणसांचे संघर्ष होते, परंतु त्याला एवढे टोकदार रूप नव्हते. टिळक-आगरकर, गांधी-आंबेडकर इत्यादी विचारवंत धुरीण लोकांमध्ये मतभेद होते परंतु मनभेद मात्र नव्हते. ही सगळी माणसे आपल्या वैचारिक अधाष्ठानावर ठाम असतांना कधीही कुणी हिंसेचा मार्ग अवलंबिलेला वाचनात नाही. आज चित्र यापेक्षा प्रचंड बदलले आहे. जात, धर्म, रंग या बाबतीत माणसे कट्टर झालेली पाहून येणारा काळ कसा असेल(?)याची भीती वाटते! जात, धर्म, रंग याला अती स्वार्थाची जोड दिली की त्याचे बीभत्स स्वरूप समोर येत असते. जगाला प्रेम अर्पावे सारखे काव्य, वसुधैव कुटुंबकम वचन किंवा सत्यम शिवम सुंदरम सारखी गीते कालबाह्य होऊन फक्त ऐकायलाच शिल्लक राहतील का? असा प्रश्न मनाला पडतो. त्यात कविवर्य इंद्रजीत भालेराव सरांच्या 'गर्भखुणा' कवितेतील

हे सिद्धच झालंय की
लोकांना प्रेम नकोय विद्वेष हवाय
पण असं कसं होऊ शकतं?
विचार करणाऱ्या प्रत्येकाला हा प्रश्न पडलाय

ह्या ओळी आणखीनच अस्वस्थ आणि अंतर्मुख करतात. असे असले तरी महापुरुष आपल्या देदीप्यमान चरित्राने आपल्यासोबत धीरोदात्तपणे उभे असतात हे विसरून चालणार नाही.

त्यातल्या त्यात डॉ.भीमराव रामजी आंबेडकरांसारखा प्रज्ञावंत महामानव नित्य सोबतीने घेतल्यास आपल्याला खडतर काळात अवघड होत चाललेला रस्ता सुकर व्हायला लागतो. अगदी वयाच्या नवव्या वर्षापासून संघर्षात वाढलेल्या बाबासाहेबांना आपल्याला आपले सन्मित्र बनवावे लागेल. बाबासाहेबांचा एक एक दिवस आणि त्यांच्या जीवनातील एकेका प्रसंगाची जाण आणि भान ठेवून त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य सोबत बाळगावे लागेल. जगातली देखणी असणारी बाबासाहेबांची लेखणी आपल्याला सोबत बाळगावी लगेल. जगात आतापर्यंत या लेखणीने अनेक क्रांतीची बीजं पेरली आहेत. त्यासाठी आपण बोधीसत्वाच्या लेखणीचा वारसा जपणे काळाची गरज आहे. अलीकडे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे; परंतु त्याप्रमाणात क्रांतिकारी, सडेतोड लेखनाचे प्रमाण दिवसेंदिवस अत्यल्प होत चालले आहे. शिकलेल्या लोकांनी आपल्या रोखठोक लेखणी म्यान केल्यामुळे इथे अविचाराचे तणकट फोफावले आहे. त्याच्या जोडीला त्याग नावाची कृती तर कुठेच दिसायला तयार नाही. पोटार्थी आणि जगण्याला हापापलेली माणसे कधीच क्रांती करू शकत नाहीत. त्यासाठी लेखणी आणि विचाराला त्यागाची जोड दिल्यास क्रांती फार दूर नाही. नक्कीच यात काही निरपराध, निष्पाप, विचारवंत लोकांचे बळी जातील, पण तेच नव्या पिढीचे नवे महात्मे असतील! क्रांतिकारी, नवीन महात्मे आणणार तरी कुठून?


भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ भाषण, मिरवणूक, लेख, पुस्तके छापण्याचे विषय नसून तो जीवनात अंगीकारण्याचा एक सर्वोत्तम,महान मार्ग आहे. भीम विचारांचा वसा घेणे काळाची गरज बनली आहे.

भिम माझा जीव आहे
गोर गरिबांची कीव आहे
विचारतोस काय गड्या?
भीम भारत जाणीव आहे

असा विचार करून हा महान विचार नित्य सोबत बाळगावा लागेल. सत्यासाठी जीवनात संघर्ष, लोकांना अंगावर घेणे याची सवय लावून घ्यायची असेल तर बाबासाहेबांची सतत संगती अत्यावश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने भारतीय संविधान आपला जीव की प्राण आहे(!) असे समजून त्याच्या रक्षणासाठी सदैव तत्पर आणि सज्ज असलेच पाहिजे. आता आपल्याला अभ्यास करून नवीन संविधान लिहिण्याची गरज नाही. फक्त डोळ्यात तेल घालून मोफत मिळालेला हा अनमोल खजाना जपावा लागणार आहे. असे करतांना आपल्यात कोणतीही कट्टरता येता कामा नये.

बाबासाहेबांचा एक एक विचार आणि महान ग्रंथ संपदा आपल्याला सोबतीने ठेवावी लागेल. असे असले तरी त्यांची व्यासंगी वृत्ती, जिद्द, चिकाटी आणि एखाद्या विषयाचे संशोधन करून त्याची मांडणी कशी करावी? हे ही शिकून घ्यावे लागेल. एखाद्या प्रश्नाच्या मुळाशी कसे जावे? त्याची सोडवणूक कशी करावी? हे आपल्याला त्यांच्याकडून शिकावे लागेल. असे असले तरी बहुजनांचे विखुरलेले संघटन मजबूत करावे लागेल. विविध जाती, धर्मातील विखुरलेल्या आंबेडकरवादी लोकांची एक वज्रमुठ बांधावी लागेल. आपला संघर्ष कुण्या व्यक्ती विरुद्ध न उभारता सर्वांनी एकजुटीने देशाच्या उत्थानासाठी काम करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी इथे प्रत्येकाला आपल्यातील 'मी' बाहेर काढून 'आम्ही' व्हावे लागेल. या वेळी केवळ देश हा धर्म सोबत असायला हवा.

बाबासाहेबांची प्रज्ञा, शील, करुणा हे तीन मूलगामी शस्त्र सोबत बाळगतांना आपले स्वत्व बाजूला ठेवावे लागेल. मोठ्या मनाने बाहेर यावे लागेल. अगोदर सामाजिक लढाई एकोप्याने लढून लोकांमध्ये नवे स्फुल्लिंग चेतवावे लागेल. सामान्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडतांना महाग होत चाललेले जगणे स्वस्त करावे लागेल. लोकांनी आपल्या गरजा मर्यादित कराव्या लागतील. व्यसने, भपकेबाजपणा, खोटा मोठेपणा, कुवत नसतांना खर्च करण्याची सवय इत्यादी बाबतीत समाज जागृत करावा लागेल. लोकांना आपल्या मर्यादांची जाणीव करून द्यावी लागेल. फुकटचे, स्वस्तातले, सरकारी योजनांवर जगणे मर्यादित करण्याचे प्रबोधन करावे लागेल. असे झाल्यास माणूस सरकार अथवा एखाद्या व्यक्तीवर अवलंबून राहणार नाही. त्याला कष्ट करायची आणि कष्टाचे खायची सवय लागेल! मागण्याच्या वृत्तीला आळा बसेल. स्वाभिमान जागृत होईल! असे होणे म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची संगती लागणे होय! चला तर मग, बाबासाहेबांसोबत आनंदी जगूया! जय भिम!



प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

# प्रज्ञासूर्य

लोकनेता न्युज नेटवर्क

कित्येक पिढ्या अंधाराने
माखुन गेलेल्या
कित्येक पिढ्या अज्ञानाने
खितपत पडलेल्या ।।ध्रु।।

माणूस असून सुद्धा माणसाने
अस्पृश्य म्हणून हिणलेल्या
माणसांना माणसाने
तुच्छ गीनल्या गेलेल्या ।।१।।

मनुस्मृतीच्या निखाऱ्याने
भाजून गेलेल्या
मग का माणसे बटवली जातीने
अनिष्ट, रूढी, परंपरा दूर केल्या बा भीमाने।।२।।

बा भीमाच्या परिसाने
इथे सोने झाले आमच्या जीवनाचे
बा भीमा तुझ्या प्रकाशाने
बळ वाढले आमच्या पंखाचे ।।३।।

ही किमया ही आमची
आनंददायी दुनिया
ज्ञानाच्या अथांग सागराची
संविधानाने दिली माया ।।४।।

**कवी:– संतोष दौलतराव कदम**
**शेकापुरकर ता:– कंधार जि:– नांदेड.**

# हिंगोली लोकसभेवर महायुतीचा झेंडा फडकवू,रामदास-पाटील सुमठानकर

## महायुतीच्या कार्यकर्त्यांना दिला शब्द बाबुराव कदम कोहळीकर यांनाच विजयी करू



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

हिंगोली लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या प्रचारासाठी हदगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ते संवाद मिळाव्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री एकनाथराव शिंदे यांनी संबोधित केलेल्या यावेळी हिंगोली लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर यांनी मार्गदर्शन केले आणि सर्वसामान्य माणसाचे प्रश्न सोडवायचे असतील तर लोकांचा प्रतिनिधी असलेल्या बाबुराव कदम कोहळीकर यांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे आव्हान कार्यकर्त्यांना केले यावेळी हजारो संख्येने महायुतीचे सर्व लोकप्रतिनिधी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी सर्वांनी एकच ध्यास धरला की आपकी बार ४०० पार घराघरात मोदीजींची विचार पोहोचवू असे यावेळी रामदास पाटील सुमठाणकर यांनी महायुतीचे पद अधिकारी व कार्यकर्त्यांसमोर विचार मांडले,

# भारतीय जवान किसान पार्टीची उमेदवारी माजी सैनिक अंकुश खोटे यांना जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के





बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आजी माजी सैनिकांचा आज बीडमध्ये आढावा बैठक मेळावा घेण्यात आला.या बैठकीला बीड जिल्ह्यातून किसान संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्त्यांसह माजी सैनिकांची मोठी उपस्थिती होती. बीड जिल्ह्यात माजी सैनिक व शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांची संख्या वीस हजारापेक्षा जास्त आहे. व भारतीय जवान किसान पार्टीचे सर्व पदाधिकारी शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर बीड जिल्ह्यात आहे. त्यांच्या सर्वांच्या विनंतीवरून निवडणुकीचा अजेंडा. विकासात्मक मुद्दे, बीड लोकसभा का लढवायची आहे?आपण निवडणूक लढवायची आणि जिंकवायची अशा साऱ्या गोष्टीवर विचार मंथन बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाभरातून माजी सैनिकांनी उपस्थिती लावली होती. अनेकानी मनोगतही व्यक्त केले. या होणाऱ्या निवडणुकीत आपलं मतदान आपल्याच माणसाला असा निर्धार चं विजयाचा केला. आपल्या समोरचे कितीही मोठे कारखानदार-वजनदार नेते असले,आमदार असले, खासदार असले तरी आपणच हे बीड लोकसभा निवडणूक जिंकायचीच असा निर्धार करण्यात आला या आढावा बैठकीला जिल्हातील आजी- माजी व शेतकरी किसान संघटनेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.भारतीय जवान किसान पार्टीचे अधिकृत उमेदवार अंकुश खोटे यांना बीड लोकसभेची उमेदवारी दिली आहे.

आज बीड जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष व आजी-माजी सैनिकांची आढावा बैठक घेत उमेदवारीची घोषणा करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे,शेतकरी संघटना राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील, प्रदेश अध्यक्ष पोपट दाते,यांनीही लोकसभेच्या अधिकृत उमेदवाराची घोषणा केली.सर्व कार्यकर्त्या समवेत त्यांना पक्षाचा बी फॉर्म देण्यात आला. यावेळी जिल्हाभरातील राज्यातील कार्याध्यक्ष प्रमोद विचारे,शेतकरी संघटना कार्याध्यक्ष कालिदास आपटे, त्रिदल कोर कमिटी अध्यक्ष अशोक चौधरी,त्रिदल कोर कमिटी उपाध्यक्ष संजीव फसले, त्रिदल बीड जिल्हाध्यक्ष महादेव बांगर साहेब बीड जिल्हा सल्लागार बळीराम राख, त्रिदल उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य समीर पठाण,आष्टी तालुका अध्यक्ष नवनाथ भगत,बीड तालुका अध्यक्ष मधुकर साळवे, गेवराई तालुका अध्यक्ष बळीराम डोंगरे, वडवणी तालुकाध्यक्ष शिवप्रसाद माळवदे,पाटोदा तालुका अध्यक्ष राम तांबे,परळी तालुकाध्यक्ष भारत गीते,माजलगाव तालुकाध्यक्ष विश्वनाथ ठोंबरे,अंबाजोगाई उपाध्यक्ष कमलाकर मालवाड, केज तालुकाध्यक्ष आज अजनुद्दीन शेख, धारूर तालुका अध्यक्ष दत्ता शिनगारे, शिरूर कासार तालुका अध्यक्ष रावसाहेब खेडकर यांच्यासह बीड जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक यांनी बीड लोकसभेचे उमेदवार म्हणून अंकुश खोटे यांना मनापासून दिले आहे. त्यांना आता बीडचा खासदार म्हणून संसदेत पाठवायचं आहे.असा निर्धार माजी सैनिकासह शहीद झालेल्या जवानाच्या कुटुंबीयांनी विजयाचा संकल्पच केला आहे या उमेदवारामुळे बीड जिल्ह्यातील मित्रपरिवार व आजी माझी सैनिकाच्या व किसान-शेतकरी कुटुंबीयात आनंद व्यक्त केला जात आहे.

# प्रेस फोटोग्राफर भीमाशंकर नावंदे यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी

## शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देवून केला वाढदिवस साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे



परळी तालुक्यातील मौजे परचुंडी येथील सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत असलेले सामाजिक कार्यकर्ते तथा प्रेस फोटोग्राफर भीमाशंकर नावंदे यांचा आज शनिवार दिनांक १३ एप्रिल रोजी वाढदिवस परचुंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करून साजरा करण्यात आला वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून भीशंकर नावंदे यांनी समाज उपयोगी उपक्रम राबवत वाढदिवस साजरा केला.

भीमाशंकर नावंदे हे राजकारण न करता नेहमीच समाजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसून येते. परचुंडी व परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी भीमाशंकर नावंदे हे नेहमीच सक्रिय असतात. युवकांना सोबत घेऊन काम करणे हे भीशंकर नावंदे यांचा नेहमी उद्देश असतो. श्री नावंदे हे नेहमीच हसतमुख सर्वांसोबत प्रेमाने वागणारे व्यक्तिमत्व म्हणून परचुंडी व पंचक्रोशीमध्ये ओळखले जाते.वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परचुंडी ता.परळी वैजनाथ येथे अनावश्यक खर्च टाळून खर्या अर्थाने समाज उपयोगी उपक्रम राबवला, यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊवाटप करून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ही मनोभावना मनात ठेवून खर्या अर्थाने भीमाशंकर नावंदे यांनी कार्य केले आहे. यावेळी जेष्ठ मंडळी सुभाष दादा रुपनर, व्यंकट पाटील गडदे, राम अण्णा सरांडे, कमलाकर नावंदे, अर्जुन सरांडे, बलभीम थोरात,बंडू सुरवसे, शंकर पत्रवाळे, दयानंद नावंदे, प्रेस फोटोग्राफर गणेश पत्रवाळे व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .दरम्यान आज सकाळपासूनच भीमाशंकर नावंदे यांना दुरध्वनी व सोशल मिडीडीयाच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, इंजिनिअर, वकील यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# लाचखोर तहसिलदार व वाहन चालक यांना दोन दिवस पोलिस कोठडी तर शिपाई यांना सूचनापत्र देऊन सोडले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


सिंदखेडराजा । ज्ञानेश्वर बुधवत





रेती लाच प्रकरणातील आरोपी तहसीलदार व वाहन चालक यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून तिसरा आरोपी शिपाई यास सूचनापत्र देऊन सोडण्यात आले आहे.

रेती व्यावसायिकाकडून ३५ हजारांची लाच घेण्याच्या प्रकरणात आरोपी तालुका दंडाधिकारी तहसीलदार सचिन शंकरलाल जैस्वाल, वय ४३ वर्षे, वाहन चालक मंगेश शालिग्राम कुलथे, वय ४० व शिपाई पंजाब तेजराव ताठे, वय ५५ यांना काल दुपारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले होते. रात्री उशीरापर्यंत चौकशी, झाडाझडती घेऊन त्यांना अटक करण्यात आली होती. यातील आरोपी शिपाई पंजाब ताठे यास सूचनापत्र देत सोडून देण्यात आले आहे. तर तहसीलदार सचिन जैस्वाल व वाहन चालक मंगेश कुलथे यांना आज दि. १३ एप्रिल, शनिवारी मेहकर न्यायालयात हजर केले असता, त्यांना दि. १५ एप्रिल, सोमवार पर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अशी माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक सचिन इंगळे यांनी दिली आहे. काल झालेल्या ह्या कारवाईमुळे विविध विभागांच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ माजली होती. तर अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर व टीप्पर चालकांची चंगळ होती, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आहे.






# राज्यात अवकाळीचे थैमान सुरूच

पुणे-राज्यावर अवकाळी पाऊस आणि गारपीटीचे संकट कायम आहे. हवामान खात्याने येत्या ४८ तासांत राज्यात पुन्हा एकदा मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. विदर्भातील काही जिल्ह्यांत गारपीटीचा इशारा देण्यात आला आहे. तर मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढणार आहे.सौराष्ट्र आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. त्यापासून मध्य महाराष्ट्र, दक्षिण कर्नाटकपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. परिणामी राज्यात विजांचा गडगडाट आणि ढगांच्या कडकडाटासह तुफान पाऊस कोसळणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे. दरम्यान, गेल्या दोन दिवसांपासून सोलापूर, परभणी, लातूर, बीड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यात वादळी वारे, विजांसह पाऊस पडला. तर तुरळक ठिकाणी गारपीट देखील झाली.







# पवनचक्की ऊर्जा प्रकल्प कंपन्यांचा मनमानी कारभार

**विंड टर्बाईन सिंड्रोम आरोग्यास धोकादायक...**

"पवनचक्की ऊर्जा प्रकल्प डोंगराळ मानवी वसाहत नसलेल्या भागात राबविण्यात येणारा प्रकल्प आहे. पवनचक्या जवळ राहणाऱ्या लोकांचे आरोग्य धोक्यात असुन विंड टर्बाईन सिंड्रोम आजाराची लक्षणे आढळुन येतात ज्या मध्ये डोकेदुखी, मळमळ, झोपेची समस्या, रात्रीची भिती, टिनिटस, चिडचिड, चिंता, एकाग्रता आणि स्मरणशक्तीच्या समस्या आणि समतोल आणि चक्कर येणे या समस्यांचा सामना करावा लागतो. त्या मुळे मानवी वसाहती मध्ये प्रकल्प राबवण्यात येऊ नये याची खबरदारी जिल्हा प्रशासनाने घ्यायला हवी.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**सामाजिक कार्यकर्ते**
**मो.नं.:- ८१८०९२७५७२**



**महाजनवाडीकर आंदोलनाच्या पवित्र्यात**





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावर पवनचक्की ऊर्जा प्रकल्प कंपन्यांनी धुमाकूळ घातला असुन शेतकऱ्यांची दिशाभूल करणे, संबंधित शेतकऱ्यांना कोणती ही पुर्वकल्पना न देताच त्यांच्या शेतजमीनीवर प्रकल्प उभारणे, विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देणे, अरेरावी करणं असे प्रकार सुरू असुन महाजनवाडी येथील ग्रामस्थांनी संबंधित प्रकरणात तहसीलदार, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक बीड यांना लेखी तक्रार करून जबरदस्तीने सुरू असलेले ऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने थांबविण्यात यावे अशी मागणी केली असुन दखल न घेतल्यास ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा ही दिला आहे. पवनचक्की ऊर्जा प्रकल्पाकडुन नियमांचे उल्लंघन, शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे.

महाजनवाडी शिवारात गट नंबर ४९६, ४९७, ४२१ व ५०१ मध्ये वडिलोपार्जित समाईक जमिन सर्वांच्या नावावर असुन सदरील समाईक शेत महसूल अभिलेखात ७/१२ पत्रकावर सर्वांच्या नावावर आहे. शेत जमिनीचे आपसात तंतोतंत वाटप आजतागायत झालेले नाही. सदर कंपनीने शरद विनायक घरत व संतोष विनायक घरत यांच्या कडून पवनचक्की ऊर्जा प्रकल्पासाठी एकुण ६ एकर जमिन २८ वर्षे ११ महिन्यांसाठी भाडे तत्वावर दुय्यम निबंधक जिल्हा कार्यालय बीड येथे दस्त क्रमांक २२५६/२०२३ दिलेली आहे. मात्र प्रकल्पाच्या नियमानुसार अगोदर शासकीय मोजणी करून जागा ताब्यात घेऊन जागेचा छ- करून संरक्षक कुंपण करून प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करणे बंधनकारक असताना जागा नावावर असलेल्या ६ पैकी ४ जणांना याची पुर्व कल्पना सुद्धा दिलेली नाही. कुठल्याही प्रकारची सहमती घेतलेली नाही. एकंदरीतच शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आलेली असुन संबंधित प्रकरणात लेखी तक्रार जिल्हा प्रशासनाला दिलेली असुन वकिलामार्फत कंपनीला नोटीस पाठवण्यात आल्याचे राजकर्ण घरत यांनी सांगितले आहे. तर घराशेजारीच पवनचक्की असल्याने जीवाची काळजी वाटते आहे. पवनचक्की घराशेजारीच उभारण्यात आली असुन आमचे मुलं आणि आमच्या गुराढोरांना या पासून धोका असुन सारखी काळजी वाटते, लिंबागणेश येथील पवनचक्की पडल्यापासून तर सारखी भिती वाटते. आमच्या जीवाला घोर लागला असुन घरतवस्ती मध्ये ५० च्या आसपास लोकं रहात असुन हा प्रकल्प बंद करण्यात यावा अशी मागणी शारदा घरत यांनी केली आहे. आमच्या पशुधनाला धोका आणि वरून शासनाच्या योजना मिळणार नाहीत. आम्ही बंदिस्त गोपालन केले असुन जवळपास सव्वाशे गाईचा सांभाळ करत दुधदुभत्याचा व्यावसाय कित्येक वर्षांपासून करत आहोत. मात्र या प्रकल्पामुळे भविष्यात पशुधनावर परीणाम होणार आहे. त्याच बरोबर १ किलो मीटर परिसरातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या सौर पंप, शेततलाव, जलसिंचन विहिर, गायगोठा, कुक्कुटपालन या शासकीय योजनांचा लाभ मिळणार नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले असल्याचे गणेश जगदाळे यांनी सांगितले आहे.



रमजान ईद निमित्त माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई व अँड.जब्बार पठाण यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा देताना. विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, पाटोदा नगर पंचायतचे नगराध्यक्ष राजुभैय्या जाधव, नगरसेवक महादेव जाधव.(छाया-लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)

# अवकाळी पावसाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या-जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अचानक झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले असून पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



शेतकऱ्यांच्या शेतात उभे टरबूज, खरबूज, आंबा, उन्हाळी पिकांचे अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आधीच शेतकरी दुष्काळाचा सामना करत असताना शासन व प्रशासन दुष्काळी उपाययोजना करण्यात कमी पडल्याचे दिसून येते अशा परिस्थितीत दुष्काळात तेरावा महिनाच की काय अशी परिस्थिती झाली असून अवकाळी व गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या नुकसानीचे प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून शासनाकडे शेतकऱ्याच्या नुकसानीचा अहवाल पाठवावा अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकातुन केली आहे.

काल परवा झालेला अवकाळी पाऊस व गारपीट या मुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. अशी मागणी राहुल जाधव यांनी पक्षाच्या वतीने केली आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मोफत दंत तपासणी शिबिर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा । ज्ञानेश्वर बुधवत**

महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्र सिंदखेडराजा येथे मोफत दंत तपासणी व अल्प दरात उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



शिबिरामध्ये मौखिक आरोग्य सेवांमध्ये दंत तपासणी,दात काढणे,रुट कॅनल, दातांमध्ये सिमेंट /चांदी भरने,दात स्वच्छ करणे,दात बसवणे, कवळी बसवणे, एक्स रे यासह अनेक सुविधा ह्या अल्प दरात देण्यात येत आहेत.

# कडेठाण नारायण नगर मध्ये उद्या श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

नारायण नगर सामाजिक संस्था व ग्रामस्थांचे वतीने कडेठाण ता.दौंड येथे प्रभु श्री राम मंदीराची उभारणी झाली असून ,मुर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण समारंभ सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

तरी या कार्यक्रमास सहकुटुंब सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन नारायण नगर सामाजिक संस्थेच्या व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



याठिकाणी दि.१४ रोजी सायं ६ ते ९ या वेळेत मुर्तीची नगर प्रदक्षिणा होईल. त्यानंतर रात्री ९ वा मुर्तीचे धान्य पुजन केले जाईल.

दि.१५ रोजी मुर्ती प्राणप्रतिष्ठा होईल सकाळी ११:१५ ते १ कलश पुजन व कलशारोहण वेळ दु.३ ते ६ वाजेपर्यंत होईल.त्या नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१७ रोजी राम जन्मोत्सव सोहळा अष्ट भविष्यकार मंडळाचे सदस्य यांचे शुभहस्ते पुजेचा विधी होईल.

सोमवार दि. १५ रोजी श्री.१०८ महंत योगी लक्ष्मण नाथजी महाराज यांच्या शुभहस्ते कलशारोहण दुपारी ३ वाजता होईल.

बुधवार दि.१७ रोजी ह.प.सतिश महाराज टिळेकर यांचे रामजन्मोत्सव सोहळा निमित्त सकाळी ९ ते ११ या वेळेत किर्तन होईल.

संपूर्ण सोहळा हा प्रभु श्री राम मंदिर नारायण नगर, कडेठाण ता. दौड,पुणे येथे होणार आहे. या सोहळ्याची संपूर्ण पुजा आचार्य गजाननजी शास्त्री गाडे गुरुजी (नव महाराष्ट्र भविष्यकार मंडळ सदस्य ) यांचे शुभहस्ते संपूर्ण पुजा होणार आहे.

तरी या सोहळ्यास भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे अवाहन कडेठाण येथील किरण दिवेकर, प्रशांत पवार, प्रविण दिवेकर,विजय पवार व नारायण नगर सामाजिक संस्था आणि ग्रामस्थांचे वतीने करण्यात आले आहे.

# अनैतिक संबंधास अडथळा ठरणाऱ्या युवकाला गाडीखाली चिरडून केले ठार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जुन्नर । मयूर ढोबळे**

अनैतिक संबंधला अडथळा ठरत असल्याच्या कारणावरून चारचाकी गाडी अंगावर घालून तरुणाचा खून करण्यात आला. ही घटना शुक्रवारी (दि. १२) दुपारी येथील पुणे - नाशिक महामार्गालगत असलेल्या एका हॉटेल समोर घडली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले आहे. याप्रकरणी नारायणगाव पोलिसांनी महिलेसह दोन जणांना अटक करून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती साहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.

साबीर मोहंमद शफी ब्यापारी (वय ४५, रा. पणसुंबा पेठ, जुन्नर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. अभिजित सोनवणे (वय २८,, रा. डिंगोरे, ता. जुन्नर) व महिला जेबा इरफान फकीर (वय ३२, रा. पणसुंबा पेठ, जुन्नर) यांना याप्रकरणी अटक केली आहे. मृत साबीर मोहंमद शफी ब्यापारी व जेबा इरफान फकीर हे दोघेही विवाहित असून जुन्नर येथे शेजारी राहण्यास आहेत. साबीर हा जेबा हिच्यावर एकतर्फी प्रेम करत होता. जेबा ही कांदळी वसाहतीत एका कंपनीत कामास होती. नोकरी निमित्त ती रोज जुन्नर ते कांदळी ये-जा करत असे. अभिजित सोनवणे हा तालुक्यात शेतजमीन मोजणीचे काम करतो. प्रवासा दरम्यान जेबा व अभिजित यांची ओळख झाली. या माध्यमातून त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. ही माहिती साबीर मोहंमद शफी ब्यापारी याला होती. यावरून साबीर व अभिजित यांच्यात वाद निर्माण झाला होता. रमजान सणासाठी गुरुवारी अभिजित हा जेबा हिच्या घरी आला होता. या वेळी तू येथे का आलास असा जाब साबीर याने अभिजित याला विचारला. यावरून पुन्हा त्यांच्यात वाद झाला होता. शुक्रवारी सकाळी जेबा ही कांदळी येथे जाण्यासाठी जुन्नर येथून बसने निघाली होती. साबीर याने तिचा पाठलाग सुरु केला. याबाबतची माहिती जेबा हिने मोबाईल कॉल करून अभिजित सोनवणे याला दिली होती. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास साबीर हा येथील पुणे-नाशिक महामार्गलगत असलेल्या अयोध्या हॉटेल येथे उभा होता. दरम्यान अभिजित याने साबीर याच्या अंगावर मोटार घालून त्याला चिरडले. या घटनेत साबीर याचा जागीच मृत्यू झाला.दरम्यान शुक्रवारी सायंकाळी मोठा मुस्लिम जनमुदाय नारायणगाव येथील पोलीस पोलीस ठाण्यात जमा झाला होता. आरोपीला अटक करण्याची मागणी मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांनी केली. पोलिसांनी पिंपळवंडी येथून आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर महिलेलाही ताब्यात घेतले. या दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली असून संगनमताने हा गुन्हा केला असल्याचे प्राथमिक तपासा निष्पन्न झाले. याबाबतचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार करीत आहे. या घटनेमुळे जुन्नर तालुक्यात खळबळ उडाली आहे.












हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904